सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२३-२०२४

### कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

### ५

### फलोत्पादन

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर
२०२३

# कार्यक्रम अंदाजपत्रक
# २०२३-२०२४

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

## ५

## फलोत्पादन

| कार्यक्रम अंदाजपत्रकाचा क्रमांक | कार्यक्रम अंदाजपत्रकाचे नाव |
|---|---|
| १ | कृषी व पदुम विभाग ( कृषी ) |
| २ | कृषी व पदुम विभाग ( पशुसंवर्धन ) |
| ३ | कृषी व पदुम विभाग ( दुग्धव्यवसाय विकास ) |
| ४ | कृषी व पदुम विभाग ( मत्स्यव्यवसाय ) |
| ५ | कृषी व पदुम विभाग ( फलोत्पादन ) |

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना ... ... ... ... | १ |
| २. | भाजीपाला, रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उद्याने योजना (राज्यस्तर) ... ... ... ... | २ |
| ३. | सिट्रस इस्टेट (२४०१बी०२५) (कार्यक्रम) (राज्य स्तर/१०० टक्के राज्य योजना) ... ... ... | ३ |
| ४. | राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत (NMSA) वन शेती उप-अभियान (SMFA) राबविणेबाबत ... ... | ३ |
| ५. | भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना ... ... ... ... | ४ |
| ६. | पीक संरक्षण योजना (राज्य पुरस्कृत) ... ... ... ... | ५ |
| ७. | आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड विकास योजना ... ... ... | ६ |
| ८. | फलोत्पादन पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण, सला योजना क्रॉपसॅप (हॉर्टसॅप्र) ... ... ... ... | ६ |
| ९. | राष्ट्रीय कृषि विकास योजना--प्रती थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन योजना) ... ... .. ... | ७ |
| १०. | मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना ... ... ... ... | ८ |
| ११. | अटल भूजल योजना ... ... ... ... | ८ |
| १२. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान ... ... ... | ९ |
| १३. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत गुणवत्ता केंद्राची स्थापना ... ... .. ... | ११ |
| १४. | इंडो-डच प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या प्रकल्पाची प्रगती ... ... ... ... | १२ |
| १५. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२२-२३ मधील कार्यक्रम ... ... ... ... | १२ |
| १६. | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान (महाराष्ट्र राज्य) सन २०२३-२४ घटकनिहाय प्रस्तावित कार्यक्रम ... ... ... ... | १३ |
| १७. | राष्ट्रीय आयुष अभियान - औषधी वनस्पती घटक ... ... ... ... | १९ |
| १८. | वित्तीय तक्ते ... ... ... ... | २० |

**प्रस्तावना--**

या प्रकाशनात कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या फलोत्पादन विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक प्रस्तुत करण्यात येत आहे. या अंदाजपत्रकात फलोत्पादन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या व येत असलेल्या योजनांबाबतचा संक्षिप्त तपशील देण्यात आलेला आहे. तसेच सन २०२३-२४ साठी प्रस्तावित तरतुदी व त्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

महाराष्ट्र हे कृषी व औद्योगिक उत्पादनाद्वारे देशाच्या आर्थिक उत्पन्नात भरीव वाढ करणारे प्रगतशील राज्य आहे. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती, जमिनीची प्रत आणि हवामानातील विविधता यामुळे राज्यात पीक लागवडीस मोठा वाव आहे. तथापि सिंचन सुविधेवरील मर्यादा, (१७.५७ टक्के) दुष्काळ अवर्षण प्रवण क्षेत्र यासारज्या अनेक कारणामुळे पारंपरिक पीकपद्धती फार किफायतशीर राहिलेली नाही. या सर्व बाबींचा विचार करून राज्याने सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. फलोत्पादन विकासाच्या दृष्टीने राज्यात सन २०१८-१९ पासून भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना नव्याने सुरु करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये नऊ कृषी हवामान विभाग आहेत. तसेच वेगवेगळी कृषी हवामानविषयक विविधता आहे. या विविधतेचा व कृषी हवामानाचा विचार करता महाराष्ट्रात विविध फळपिके येऊ शकतात. फलोत्पादनाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र सहा विभागात विभागला जाऊ शकतो. त्यामध्ये कोकण विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. कोकण किनारपट्टीमध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, मसाल्याची पिके चांगल्या रितीने येतात. हा विभाग फलोत्पादनासाठी अत्यंत उपयुक्त असल्यामुळे क्षेत्रवाढीवर तसेच इतर सुविधा निर्माण करण्यावर या विभागात भर देण्यात येत आहे. राज्यातील खानदेश हा भाग केळीसाठी प्रसिध्द आहे. या विभागातून देशातील विविध भागात मुख्यत: उत्तर भारतात केळीचा पुरवठा होतो. विदर्भात नागपूर, अमरावती भाग संत्र्यासाठी प्रसिद्ध आहे. नागपूर संत्र्याने बाजारात सध्या स्वत:चे असे नाव निर्माण केले आहे. राज्यातील मध्य व दक्षिण पूर्व कोरडवाहू भाग डाळिंब व मोसंबीसाठी प्रसिद्ध आहे. तसेच सांगली, पुणे, नाशिक, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर द्राक्ष व डाळिंब पिकविले जातात. द्राक्षामध्ये राज्याची देशांतर्गत बाजारपेठेत तसेच विदेशी बाजारपेठेत निर्यातीमध्ये चांगली वाढ आहे.

फळे, फुले, भाजीपाला पिके, मसाल्याची पिके, या उद्यानविद्या पिकाची उत्पादकता तसेच त्यापासून मिळणारा मोबदला अधिक असल्याने मागील दशकापासून या पिकाच्या लागवडीस विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे. यामुळे रोजगार निर्मिती व उत्पादनावर आधारित जोडधंदे यांना चालना मिळणार आहे. राज्यांतील उद्यानविद्या पिकाखालील क्षेत्रांचा अंदाज खालीलप्रमाणो आहे.

(प्रथम अंदाज २०२२-२३)

| पीक | लागवडी खालील क्षेत्र (लाख हेक्टर) | उत्पादनक्षम क्षेत्र (लाख हेक्टर) | अंतिम उत्पादन (लाख मे.टन) |
|---|---|---|---|
| फळे | ८.३१ | ८.३१ | १२६.०६ |
| भाजीपाला | ११.६२ | ११.६२ | १८९.२७ |
| मसाला | १.१५ | १.१५ | १७.४९ |
| फुले | ०.१० | ०.१० | १.४७ |

राज्यात १८.५४ लाखाहून अधिक क्षेत्र रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत विविध फळपिकांच्या लागवडीखाली आले आहे. फळाचे एकूण उत्पादन सुमारे १२६.०६ लाख मे. टन आहे. फळपिकाखालील क्षेत्रात भरीव वाढ झाल्याने राज्याला कृषी निर्यात प्रक्षेत्र (ॲग्रो एक्सपोर्ट झोन) मंजूर झालेले आहेत. यामध्ये आंबा, द्राक्ष, डाळिंब, केळी यांचा समावेश आहे.

राज्यात सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून सुमारे १८.३६ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आहे. हे देशातील सर्वात अधिक क्षेत्र असणारे महाराष्ट्र राज्य आहे. त्याचप्रमाणे हरितगृहातील शेतीमध्येही देशात राज्य आघाडीवर आहे.

राज्यातील उद्यानविद्या पिकाखालील वाढते उत्पादन आणि क्षेत्र विचारात घेऊन राज्याने कृषि उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग बाजार माहिती केंद्र या दृष्टीकोनातून योजना राबविण्यास प्रोत्साहन दिले आहे. यामध्ये प्रकल्प अहवाल बनविणे, बाजार माहिती केंद्र आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात मालाचा नमुना पाठविणे यासारख्या अनेक योजनांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त कुटीर उद्योगाच्या स्वरुपात काजू प्रक्रिया युनिट, हळद जागतिक व्यापार करारामुळे उपलब्ध होणाऱ्या निर्यातीच्या संधी तसेच आयातीचे आव्हाने या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. मसाला प्रक्रिया युनिट, औषधी/सुगंधी वनस्पतीपासून औषधी सुगंधी द्रव्य विलग करणे वगैरे घटकांचा योजने अंतर्गत समावेश आहे.

फलोत्पादन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांची माहिती सन २०२१-२२ मधील तरतूद व झालेला खर्च २०२२-२३ मधील तरतूद व अंदाजित खर्च आणि २०२३-२४ मधील प्रस्तावित कार्यक्रम नमूद केलेला आहे. तसेच योजनेतील फलनिष्पत्ती बाबतही माहिती अंतर्भूत केलेली आहे.

## योजनेचे नाव :- भाजीपाला रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उद्याने (राज्यस्तर)

**१. योजनेची माहिती व उद्देश :--**

राज्यातील एकूण १४५ शासकीय रोपवाटिकांसाठी ही योजना राबविणेत येत आहे.

सर्व फळरोपवाटिकांचे संचलनासाठी रोपवाटिकांवर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या योजनेतून वेतन, मजुरी, परिरक्षण, कार्यालयीन खर्च, प्रवास खर्च इत्यादी बाबींसाठी तरतूद करण्यात येते. या योजने अंतर्गत पुढीलप्रमाणो एकूण १२०७ पदे मंजूर आहेत.

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | कृषी अधिकारी | ४१८००-१३२३०० | ४२ |
| २ | कृषी पर्यवेक्षक | ३५४००-११२४०० | ९० |
| ३ | कृषी सहाय्यक | २५५००-८११०० | १३२ |
| ४ | लिपिक | १९९००-६३२०० | १३० |
| ५ | रोपमळा मदतनीस | १८०००-५६९०० | ६२२ |
| ६ | शिपाई | १५०००-४७६०० | १३४ |
| ७ | ग्रेड १ मजूर | १५०००-४७६०० | ४२ |
| ८ | टिलर ऑपरेटर | १५०००-४७६०० | १५ |
| | **एकूण पदे** | | **१२०७** |

या योजनेतून शासकीय रोपवाटिकासाठी वेतन व मजुरी, सामुग्री व विकास कामे करून घेण्यात येतात. या योजनेमुळे रोपवाटिकावर विविध फळे, फुले, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती, मसाला पिके इत्यादींच्या कलमे रोपांचे उत्पादन घेण्यात येते.

**२. योजनेची सन २०२२-२३ साठी निश्चित केलेले लक्ष व साध्य :--**

शासकीय रोपवाटिकावर विविध फळझाडे व फुलपिकांचे ८०.०० लाख कलमे/रोपे उत्पादनाचे लक्ष निश्चित करण्यात आले असून उत्पादित होणारी कलमे/रोपे प्रामुख्याने भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निगडीत फळबाग लागवड योजनेत व रोख विक्रीसाठी वापरली जातात.

**३. योजनेची सन २०२१-२२ साठी केलेली आर्थिक तरतूद, झालेला खर्च व फलनिष्पती :--**

सन २०२१-२२ साठी या योजनेत रुपये ६९५३.२० लाख अनुदान उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यापैकी वर्ष अखेरीस रुपये ५०९८.६६ लाख खर्च झालेला आहे. प्रत्यक्षात ५४.७१ लाख कलमे/रोपांचे उत्पादन झाले. ही तयार झालेली कलमे/रोपे विविध फळबाग लागवड कार्यक्रमात वितरित व रोख विक्रीने शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

फळझाडांची कलमे/रोपे उत्पादनाबरोबरच फुलझाडांची व भाजीपाला पिकांची, कलमे/रोपे उत्पादनाचे कार्यक्रमही शासकीय रोपवाटिकावर राबविणेत येत आहेत. सन २०१८-१९ ते २०२१-२२ या वर्षातील योजनेचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

राज्य योजनांच्या सन २०१७-१८ मधील पुनर्रचनामुळे संपूर्ण अनुदान एकाच लेखाशिर्षाखाली (२४०११७२२) उपलब्ध होत आहे.

| अ. क्र. | वर्ष | | अनुदान व खर्चाचा तपशील (रुपये लाखात) | | | कलमे रोपे उत्पादन (संख्या हजारात) | कलमे रोपे विक्रीपासून महसूल जमा रक्कम हजारात |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुदान | खर्च | | | |
| १) | २०१८-२०१९ | .. | ४४०२.४९ | ४४०२.४९ | .. | ६००० | १,८०,००० |
| २) | २०१९-२०२० | .. | ५०३२.६५ | ४९७३.६७ | .. | ७३५३ | १,६०,७०० |
| ३) | २०२०-२०२१ | .. | ६२१९.५४ | ४२९६.६२ | .. | ८००० | १,८०,००० |
| ४) | २०२१-२०२२ | .. | ६९५३.२० | ५०९८.६० | .. | ५४७१ | २,१०,६७८ |
| ५) | २०२२-२०२३ | .. | ७६१९.५८ | ... | .. | ९५०० | ३५०७८१ |
| ६) | २०२३-२०२४ (प्रस्तावित) | .. | ८३८१.५३ | ... | ... | ... (अपेक्षित) | ... (अपेक्षित) |

**योजनेचे नाव :-- सिट्रस इस्टेट (२४०१बी०२५) (कार्यक्रम) (राज्य स्तर/१०० टक्के राज्य योजना)**

मध्यवर्ती रोपवाटिका उमरखेड, ता. मोर्शी, जि. अमरावती, तालुका फळरोपवाटिका धिवरवाडी, ता. काटोल, जि. नागपूर आणि तालुका फळरोपवाटिका तळेगाव, ता. आष्टी, जि. वर्धा व तालुका फळ रोपवाटीका, पैठण, जि. औरंगाबाद या ४ फळरोपवाटिकांच्या जागेवर "सिट्रस इस्टेट" स्थापन करण्यात येणार आहेत. "सिट्रस इस्टेट" ह्या "स्वायत्त संस्था" म्हणून स्थापन करण्यात येणार आहेत. संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा आणि कार्यकारी समिती सिट्रस इस्टेट स्थापन करण्यात येणार आहे. संत्रा उत्पादक सर्व शेतकरी सर्वसाधारण सभेचे सदस्य असणार आहेत. कार्यकारी समितीमध्ये दोन शेतकरी प्रतिनिधी, जिल्हा लिड बँक मॅनेंजर, जिल्हा पणन अधिकारी, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक, महाऑरेंजचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल.

सिट्रस इस्टेट अंतर्गत रोपवाटीकांवर सुधारित वाणांच्या मातृवृक्षांची लागवड करणे, त्या ठिकाणी आवश्यकतेनुरूप शेडनेट, पॉलीहाऊस उभारणे, सिंचन सुविधा इत्यादीची उभारणी करणे, सिट्रस इस्टेट प्रशासकीय इमारत बांधकाम, कार्यालय, प्रयोगशाळा, प्रशिक्षण भवन, निविष्ठा विक्री केंद्र, कलेक्शन, ग्रेडिंग, कोटिंग, पॅकिंग, साठवणूक युनिटची इ. बांधकामे प्रस्तावित आहेत. शेतकऱ्यांसाठी वाजवी दरात यांत्रिकीकरणाची सुविधा निर्माण करण्यासाठी अवजारे बँक स्थापन करण्यात येणार आहे. निविष्ठा केंद्रातून शेतकऱ्यांना वाजवी दरात निविष्ठा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रयोगशाळांना जैविक खत उत्पादन, मृद व पाणी परिक्षण, ऊती व पाने पृथ्थ:करण यासाठी सामुग्री व रसायनांचा पुरवठा करण्यात येणार आहे.

या योजनेची व्याप्ती वाढवून मौजे मासोदे, ता. चांदूरबाजार, जिल्हा अमरावती येथे सिट्रस इस्टेट आणि तालुका फळरोपवाटिका पैठण, जि. औरंगाबाद येथे मोसंबी इस्टेट स्थापन करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | वर्ष | | अर्थसंकल्पीय तरतूद (रु. लाख) | सुधारित अंदाज (रु. लाख) | अनुदान (रु. लाख) | खर्च (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१९-२० | .. | १५००.०० | ३२३.४४ | ३१७.१८ | ३१७.१८ |
| २ | २०२०-२१ | .. | १५००.०० | १५००.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | २०२१-२२ | .. | १५००.०० | १३०५.२७ | ९५७.०७ | ९२०.७१ |
| ४ | २०२२-२३ | .. | ५९७३.९७ | १६७२.७१ | ६५४.२४ | ... |
| ५ | २०२३-२४ (प्रस्तावित) | .. | ६५७१.३६ | ... | प्रशासकीय मान्यता अप्राप्त | |

## राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत (NMSA) वनशेती उप अभियान (SMAF) राबविणेबाबत

केंद्र शासनाने सन २०२१-२२ या वर्षापासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत वनशेती उप अभियानाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे. सदर अभियानाची अंमलबजावणी राज्यात करण्यासाठी शासन निर्णय क्र. शाशेअ-२०१७/प्र.क्र. १२६/४ अे दिनांक ८ डिसेंबर, २०१७ शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

**वनशेती उप अभियानाची प्रमुख उद्दिष्टे :**

१. एकमेकांना पूरक व एकात्मिक पद्धतीने पिकांची व पशुधनाची उत्पादकता वाढविणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, ग्रामीण भागातील विशेषत: छोट्या शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारणेस प्रोत्साहन देणे.

२. बियाणे, रोपे, संकरित व विकसित जातीची बियाणे इत्यादी लागवड साहित्याची पुरेशी उपलब्धता व पुरवठा करणे.

३. जमीन वापराच्या परिस्थितीनुसार वनशेतीसाठी अनुकूल प्रॅक्टिस/मॉडेल्स लोकप्रिय करणे.

४. वनशेती क्षेत्रास सहाय्यभूत ठरेल अशाप्रकारची माहिती गोळा करणे व तंत्रज्ञान निर्माण करणे.

५. वनशेती क्षेत्राचा विस्तार व क्षमता बांधणीसाठी सहाय्य करणे.

सदर योजनेमध्ये केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात राहील. वनशेती उपअभियानांतर्गत घटकांकरिता मापदंडाच्या ५० टक्के रक्कम अनुदान देण्यात येते. सदर अनुदान चार वर्षांमध्ये ४०:२०:२०:२० या गुणोत्तराप्रमाणे देण्यात येते. ५० टक्के निधी हा अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी पैकी ३० टक्के निधी महिलांकरिता खर्च करणे अपेक्षित आहे. तसेच अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थीकरिता १६ व ८ टक्के निधी खर्च करता करण्यात येतो.

सन २०२०-२१ च्या कार्यक्रमासाठी रुपये ३३५.०२ लाख मंजूर असून केंद्र हिस्सा रुपये २००.०० लक्ष व राज्य हिस्सा रुपये ३३५.०२ लक्ष निधीचा समावेश आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये ११३.०७ लाख प्राप्त असून मार्च, २०२१ अखेरचा ७८.५७ लाख खर्च झाला आहे.

सन २०२१-२२ योजनेसाठी केंद्र हिस्सा रुपये २२३.४४ लक्ष व राज्य हिस्सा रुपये १४८.९६ लक्ष मिळून एकूण रुपये ३७२.४० लाख निधीचा वार्षिक कृषी आराखडा मंजूर करण्यात आला आहे. सदरचा निधी हा रोपवाटिकांवर रोपे उत्पादीत करण्यासाठी तसेच योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांवर खर्च करण्यात येणार होता. सन २०२१-२२ मध्ये केंद्र हिस्सा रु. १०५.७४ लाख व राज्य रु. ७०.३१६ लाख असा एकूण १७६.०६ लाख निधी प्राप्त झाला होता. मार्च २०२२ अखेर ७८.३९ लाख खर्च झालेला आहे. सन २०२२-२३ साठी, सन २०२१-२२ मधील अखर्चित रु. ११९.२२७३६ लाख पुनरुज्जिवीत करून जिल्हा निहाय वितरीत करण्यात आलेला आहे. तथापि सन २०२२-२३ साठी प्र.मा. नाही. सदर योजना वनविभागाकडे हस्तांतर प्रस्तावित केले आहे.

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

शासन निर्णय क्र. राफयो-२०१८/प्र.क्र. ४७/९ अे दिनांक ६ जुलै, २०१८ अन्वये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून राबविण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

**उद्देश :**

१. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.

२. फळझाडे लागवडीच्या माध्यमातून तरुण शेतकऱ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

३. पीक रचनेत बदल घडवून आणणे.

४. पीक व पशुधन याबरोबरच फळबागेच्या रुपाने शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा नवीन स्त्रोत उपलब्ध करुन देणे.

५. नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन तसेच तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता  व तीव्रता कमी करणे.

६. प्रक्रिया उद्योगांसाठी आवश्यक कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे.

या योजने अंतर्गत एकूण १६ बहुवार्षिक फळपिकांचा समावेश करण्यात आला असून, फळपिकांची कलमांद्वारे / रोपांद्वारे लागवड करण्यास मान्यता आहे. सदर योजने अंतर्गत फळबाग लागवडीकरिता कोकण विभाग वगळता ठिबक सिंचन संच बसविणे तसेच कागदी लिंबू, संत्रा व मोसंबी या लिंबूवर्गीय फळपिकांच्या लागवडीकरिता माती परिक्षण करणे अनिवार्य आहे. योजनेचा लाभ कोकण विभागासाठी किमान ०.१० हेक्टर ते कमाल १०.०० हेक्टर तर उर्वरित विभागासाठी किमान ०.२० हेक्टर ते कमाल ६.०० हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत अनुज्ञेय राहील.

योजने अंतर्गत लाभार्थ्यास एकूण ३ वर्षाच्या कालावधीत ५०:३०:२० प्रमाणे अनुदान देय राहील. प्रतिवर्षी देय असलेले अनुदान लाभार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर वर्ग केले जाईल. यासाठी लाभार्थ्याने लावलेली फळझाडे पहिल्या वर्षी किमान ८० टक्के व दुसऱ्या वर्षी किमान ९० टक्के जगविणे आवश्यक आहे.

**अ)** सदर योजना राबविण्यासाठी प्र. मान्यता नसल्याने लक्षांक देण्यात आला नाही. सन २०१९-२० मधील लागवडीचे प्रलंबित दायीत्व भागविण्यासाठी सन २०२१-२२ मध्ये रु. ३८३१.४७ लाख अनुदान प्राप्त असून मार्च, २०२२ अखेर रु. ३८००.१५ लाख निधी खर्च झाला आहे.

**ब)** शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी २०२३ अन्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी रुपये ४२००.०० लाख निधी मा. कृषि आयुक्त यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर  उपलब्ध करून देण्यात आला आहे. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०२२-२३ मध्ये राबविण्यासाठी शा.नि.दि. ०४ ऑक्टोबर, २०२२ अन्वये १०४५०.०० लाख निधीस मान्यतेसह प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर योजना MAHA DBT या प्रणालीद्वारे राबविण्याची कार्यवाही सुरू आहे.

## योजनेचे नाव :-- पीक संरक्षण योजना (राज्य पुरस्कृत)

**१. उद्देश -**

फळपीक व भाजीपाला पिकांवर कीड रोगाचा प्रादूर्भाव कमी/जास्त प्रमाणात आढळून येत असतो. जेणेकरुन उत्पादनात घट आढळून येते. सदरचे उत्पादनात घट होऊ नये आणि शेतकऱ्यांना फवारणी करणेसाठी काही मदत व्हावी यादृष्टीने फवारणी कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. यामुळे उत्पादनात निश्चित अशी वाढ होऊ शकेल. राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना त्यांचे फळझाडे, भाजीपाला पिकावरील कीड/रोगाचे नियंत्रणासाठी कीटकनाशके, बुरशीनाशके फवारणीसाठी औषधाचे किमतीवर ५० टक्के अनुदान देण्यात येत होते. सन २०१७-१८ पासून सदर योजना राज्य योजना म्हणून राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत संत्रा पिकावरील काळी / पांढरी माशी (कोळशी) व फायटोप्थोरा रोग, आंबा पिकावरील तुडतुडे व भुरी, चिक्कूवरील बी-पोखरणारी अळी, डाळींब पीकावरील पिन होल बोरर, काजूवरील टी मॉस्कुटो, नारळावरील इरिओफाइड माईटस, सुपारीवरील कोळे रोग, केळी पिकावरील करपा, बटाट्यावरील करपा रोग, मिरचीवरील चुरडा मुरडा, कांद्यावरील फुलकिडे व करपा आणि पानमळ्यावरील करपा या रोगाच्या नियंत्रणासाठी पीक संरक्षण औषधे पुरविण्याचे प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त इतर महत्त्वाची फळपिके, भाजीपाला, फुलपिके, औषधी वनस्पती या पिकांवर कीड/रोग आढळून आल्यास त्यावरही पीक संरक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

**२. योजनेची सन २०२१-२२ साठी केलेली आर्थिक तरतूद व झालेला खर्च व २०२२-२३ मधील लक्षांक आणि २०२३-२४ चा प्रस्तावित कार्यक्रम**

(रु. लाखात)

| अ.क्र. | पीक | सन २०२१-२२ | | | | सन २०२२-२३ मंजूर कार्यक्रम | | | | सन २०२३-२४ प्रस्तावित कार्यक्रम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक (हेक्टर) | | आर्थिक | | भौतिक (हेक्टर) | | आर्थिक | | भौतिक (हेक्टर) | आर्थिक |
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | लक्ष्य |
| **पीक संरक्षण औषधे** | | | | | | | | | | | |
| १ | संत्रा | | | | | | | | | | |
| २ | आंबा | .. | .. | ०.०१ | ०.०१ | .. | .. | ०.०१ | ०.०१ | १७६४७ | २११.७६४ |
| ३ | नारळ | | | | | | | | | | |
| ४ | चिक्कू | | | | | | | | | | |
| ५ | डाळिंब | | | | | | | | | | |
| ६ | काजू | | | | | | | | | | |
| ७ | बटाटा | | | | | | | | | | |
| ८ | मिरची | | | | | | | | | | |
| ९ | कांदा | | | | | | | | | | |
| १०. | सुपारी | | | | | | | | | | |
| | **एकूण** | **..** | **..** | **०.०१** | **०.०१** | **..** | **..** | **०.०१** | **०.०१** | **१७६४७** | **२११.७६४** |

**३. योजनेची फलनिष्पती-**

फळपिके व भाजीपाला पिकावरील फवारणी कार्यक्रमामुळे कीड रोगाचे नियंत्रण करणेसाठी मदत झालेली आहे.

## योजनेचे नाव :- आदिवासी कुटुंबाच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड विकास योजना

**१. उद्देश -**

राज्यातील १४ जिल्ह्यामध्ये आदिवासी भाग असून या भागात कुपोषणााचे प्रमाण जास्त आहे. आदिवासी कुटुंबाच्या आहारात जीवनसत्त्व व इतर आवश्यक पोषक द्रव्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या भागासाठी पौष्टीक आहार योजना सुरू केली आहे. याकरिता परसबागेत उपयुक्त फळे व भाजीपाल्याचा समावेश करून आहार अन्नद्रव्याच्या दृष्टीने परिपूर्ण करणे शक्य आहे. त्यामुळे 'अ', 'क' या जीवनसत्त्वाची आणि लोह या खनिजाचा पुरवठा करणारी फळे व भाजीपाला पिकांची आदिवासीच्या परसबागेत लागवड करण्याची योजना सन १९९८-९९ पासून शासनाने अमरावती जिल्ह्यासाठी मंजूर केली होती. त्याच धर्तीवर सन २००३-०४ पासून ठाणे, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, नांदेड, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, गोंदिया व पालघर या १४ जिल्ह्यात योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत प्रति लाभार्थीस रु. ३९०/- इतकी किमतीची निविष्ठा देण्यात येते. यामध्ये फळे व भाजीपाल्याची कलमे/रोपे, तसेच भाजीपाला बियाणे, पुरविण्याचे प्रस्तावित आहे.

**२. योजनेची सन २०२१-२२ साठी केलेली आर्थिक तरतूद व झालेला खर्च व २०२२-२३ मधील लक्षांक आणि २०२३-२४ चा प्रस्तावित कार्यक्रम**

(रु. लाखात)

| अ.क्र. | पीक | सन २०२१-२२ | | | | सन २०२२-२३ मंजूर कार्यक्रम | | | | सन २०२३-२४ प्रस्तावित कार्यक्रम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक संख्या | | आर्थिक | | भौतिक संख्या | | आर्थिक | | भौतिक संख्या | आर्थिक |
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| १ | लाभार्थी | ७१४३ | ७१४२ | १८.०० | १७.९९५ | ८४६१ | ८४६१ | ३३.०० | २८.२९ | ९३०७ | ३६.३० |

**३. योजनेची फलनिष्पती--**

सदर योजना आदिवासी क्षेत्रात राबविल्यामुळे कुपोषणाचा प्रश्न सुटण्यास मदत झालेली आहे.

## योजनेचे नाव :- फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला योजना (क्रॉपसॅप) (हॉर्टसॅप)

**उद्देश -**

सन २०११-१२ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत फलोत्पादन पिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करण्यात आलेला आहे. आंबा, डाळिंब आणि केळी फळपिकावरील कीड रोगांचे सर्वेक्षण करणे तसेच कीड व रोगावरील उपाययोजनेसाठी शेतकऱ्यांना सल्ला देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

सदरचा प्रकल्प सन २०११-१२ पासून ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अहमदनगर, सोलापूर, सांगली, नाशिक, जळगाव या नऊ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत कीड सर्वेक्षक, पेस्ट मॉनिटर, संगणक प्रचालक यांची नियुक्ती, प्रशिक्षण कार्यक्रम, सर्वेक्षण किटचा पुरवठा, संगणक आज्ञावली तयार करणे, एसएमएस सर्व्हिस, प्रपत्रे छपाई व औषध पुरवठा असे महत्त्वाचे घटक आहेत. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कीड रोगाचे सर्वेक्षण करून उपाययोजनेसाठी सल्ले देण्यात येत आहेत. आंबा, डाळिंब, केळी, चिक्कू, संत्रा व मोसंबी या फळ पिकांकरिता सन २०१६-१७ मध्ये सदर प्रकल्प पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड, जालना, उस्मानाबाद, हिंगोली, नांदेड, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा व नागपूर या २३ जिल्ह्यात राबविण्यात आला आहे. सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा क्रॉपसॅप अंतर्गत समावेश करण्यात आलेला आहे. सन २०२०-२१ पासून सदर योजनेत काजू, भेंडी व टोमॅटो ही पीके नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

सन २०२२-२३ पासून योजनेचा विस्तार ३० जिल्ह्यात करण्यात येत आहे. (ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, बीड, लातुर, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया).

**योजनेची सन २०२१-२०२२ मध्ये केलेली आर्थिक तरतूद व झालेला खर्च व २०२२-२०२३ मधील लक्षांक आणि २०२३-२०२४ चा प्रस्तावित कार्यक्रम**

| अ.क्र. | पीक | सन २०२१-२२ | | | | सन २०२२-२३ मंजूर कार्यक्रम | | | | सन २०२३-२४ प्रस्तावित कार्यक्रम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक (हेक्टर) | | आर्थिक | | भौतिक (हेक्टर) | | आर्थिक | | भौतिक (हेक्टर) | आर्थिक |
| | | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | लक्ष्य |
| **पीक संरक्षणा औषधे** | | | | | | | | | | | |
| १ | आंबा | | | | | | | | | | |
| २ | डाळिंब | ६.५४ | ६.५४ | २०७.३४ | १३२.६४ | ६.५९ | ६.५९ | २७८.६४ | ३६.१८ | ६.६ | ५३२.३९ |
| ३ | केळी | | | | | | | | | | |
| ४ | चिक्कू | | | | | | | | | | |
| ५ | संत्रा | | | | | | | | | | |
| ६ | मोसंबी | | | | | | | | | | |
| ७ | काजू | | | | | | | | | | |
| ८ | भेंडी | | | | | | | | | | |
| ९ | टोमॅटो | | | | | | | | | | |
| | **एकूण** | **६.५४** | **६.५४** | **२०७.३४** | **१३२.६४** | **६.५९** | **६.५९** | **२७८.६४** | **३६.१८** | **६.६** | **५३२.३९** |

**योजनेची फलनिष्पत्ती :** आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू, काजू, भेंडी, टोमॅटो या फळपिकांवरील कीड व रोगाचे वेळीच नियंत्रण करणे शक्य झाले आहे.

## राष्ट्रीय कृषि विकास योजना :--प्रती थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन योजना)

पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविणे, तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जलवापर क्षमतेत वाढ करणे, तुषार व ठिबक अशा पाणी वाचविणाऱ्या सिंचन पद्धतींचा अवलंब करणे, यासाठी प्रोत्साहन देऊन सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करणे या उद्देशाने सन २०१५-१६ पासून सूक्ष्म सिंचन योजना "प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना-प्रती थेंब अधिक पीक" या केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेमध्ये समाविष्ट करून राज्यात राबविण्यात येत होती. सन २०२२-२३ पासून ही योजना राष्ट्रीय कृषी विकास योजना (कॅफेटेरिया वार्षिक कृती आराखडा आधारित) या योजनेचा घटक म्हणून राबविण्यात येत आहे. योजनेत केंद्र व राज्य हिस्स्याच्या अर्थसहाय्याचे प्रमाण ६०:४० आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून २०२१ मध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदानाचे निकष असून क्षेत्राची मर्यादा ५ हेक्टर आहे. सद्य:स्थितीत सन २०२०-२१ पासून ही योजना महा.डी.बी.टी. पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. महा.डि.बी.टी. पोर्टलवर शेतकऱ्यांना विविध योजनांसाठी लाभ देण्यात येत असून याकरिता शेतकऱ्यांना एकदाच अर्ज करावा लागतो. तसेच सन २०२०-२१ आणि २०२१-२२ या वर्षामध्ये दिनांक २३ डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण २.५२ लाख हे एवढे क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे.

सन २०१५-१६ पासून ते २०२१-२२ या कालावधीमधील भौतिक व आर्थिक प्रगती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्ष | सूक्ष्म सिंचनाखाली क्षेत्र (लाख हे.) | लाभार्थी संख्या | अनुदान वितरित निधि (रु. कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ०.४१ | ५५०११ | १२९.३९ |
| २ | २०१६-१७ | १.३४ | १६२४३० | ४१४.६२ |
| ३ | २०१७-१८ | २.०९ | २६३२४० | ६८७.७० |
| ४ | २०१८-१९ | १.३१ | १७५०८४ | ४१५.९६ |
| ५ | २०१९-२० | १.५१ | १९९२६७ | ५१६.९२ |
| ६ | २०२०-२१ | ०.६९ | ८७५७४ | १६३.४२ |
| ७ | २०२१-२२ | १.८३ | २२२९०८ | ५६२.२३ |
| **एकूण** | | **९.१८** | **११६५५१४** | **२८९०.२४** |

**सन २०१५-१६ ते सन २०२१-२२ या कालावधीत पिकनिहाय सूक्ष्म सिंचनाखाली आलेले क्षेत्र (लाख हे.)**

| अ.क्र. | पिके | वर्ष | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | एकूण |
| १ | कापूस | ०.१२ | ०.५८ | ०.८३ | ०.४१ | ०.५५ | ०.१२ | ०.४१ | ३.०१ |
| २ | ऊस | ०.०७ | ०.१६ | ०.२८ | ०.१२ | ०.१३ | ०.०६ | ०.२० | १.०२ |
| ३ | इतर पिके | ०.१२ | ०.३६ | ०.६२ | ०.४६ | ०.५१ | ०.३१ | ०.७० | ३.०७ |
| ४ | भाजीपाला | ०.०३ | ०.०६ | ०.०६ | ०.०५ | ०.०८ | ०.०८ | ०.२० | ०.५६ |
| ५ | केळी | ०.०२ | ०.०३ | ०.०५ | ०.०६ | ०.०५ | ०.०२ | ०.०५ | ०.२७ |
| ६ | डाळिंब | ०.०३ | ०.०५ | ०.०७ | ०.०५ | ०.०६ | ०.०३ | ०.०७ | ०.३६ |
| ७ | लिंबूवर्गीय पिके | ०.०१ | ०.०६ | ०.११ | ०.१० | ०.०९ | ०.०५ | ०.१२ | ०.५३ |
| ८ | द्राक्ष | ०.०२ | ०.०३ | ०.०८ | ०.०६ | ०.०५ | ०.०४ | ०.०७ | ०.३६ |
| | **एकूण** | **०.४१** | **१.३४** | **२.०९** | **१.३१** | **१.५२** | **०.६९** | **१.८३** | **९.१८** |

राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रती थेंब अधिक पीक सन २०२२-२३ मध्ये राबविण्याकरिता शासनाकडून रु. ६६६.६६ कोटी रकमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. केंद्र शासनाकडुन पहिला व दुसरा हप्ता मिळून रु. १७८.०० कोटी प्राप्त झाला असून राज्यशासनाने रु. २९६.६६ कोटी (केंद्र हिस्सा- रु. १७८.०० व राज्य हिस्सा रु. ११८.६६ कोटी) रकमेचा निधी वितरित केला आहे व सदर निधी जिल्हास्तरावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सन २०२२-२३ मध्ये दिनांक ३१ जानेवारी, २०२३ अखेर ६६४८३० शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचनाचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला असून त्यापैकी ५३६४२१ शेतकऱ्यांची महा.डी.बी.टी. पोर्टलवर लॉटरीद्वारे निवड झाली आहे. २०५१२३ लाभार्थ्यांनी महा.डी.बी.टी. पोर्टलवर कागदपत्रे अपलोड केले असून त्यापैकी १७४७६३ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली आहे. १३५७१४ शेतकऱ्यांनी संच बसवुन देयके अपलोड केलेली आहेत. मोका तपासणी पूर्ण झालेल्या ९२७०६ लाभार्थ्यांपैकी १९३७३ शेतकऱ्यांना रु. ५७.७८ कोटी अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे. उर्वरित लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरुन सुरू आहे.

## सूक्ष्म सिंचन घटक पूरक अनुदानाकरिता विविध योजना

## मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना

राज्यातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याच्या उददेशाने अवर्षणप्रवण क्षेत्र तसेच आत्महत्याग्रस्त व नक्षलग्रस्त जिल्ह्यात मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना राबविण्यास दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे निर्गमित निर्णयानुसार सदर योजना राज्यातील उर्वरीत १०७ तालुक्यांमध्ये राबविण्याचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रती थेंब अधिक पीक अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाशिवाय मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेतंर्गत अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पुरक अनुदान देऊन सुक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे ८० टक्के व ७५ टक्के एकुण अनुदान देण्यात येणार आहे. सन २०२१-२२ आणि २०२२-२३ मध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेकरीता रु. ४०४.०० कोटी निधी शासनाने उपलब्ध करून दिला असून राष्ट्रीय कृषि विकास योजना-प्रती थेंब अधिक पीक योजनेंतर्गत सन २०२१-२२ आणि २०२२-२३ मध्ये लाभ देण्यात आलेल्या २२२७६० लाभार्थ्यांची मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत महा.डी.बी.टी. पोर्टलव्दारे लॉटरी पध्दतीने निवड झाली असून दिनांक ३१ जानेवारी, २०२३ अखेर २०४०९३ लाभार्थ्यांना रु. २५८.५२ कोटी अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. सन २०१९-२० आणि २०२०-२१ मधील PMKSY-PDMC मध्ये लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पूरक अनुदानाचा लाभ देण्यासाठी रु. ३३३.८३ कोटी निधी शासनाने मंजूर केला असून रु. १५०.०० कोटी उपलब्ध करून दिला आहे. क्षेत्रीय स्तरावरून शेतकऱ्यांना निधी वितरणाची कार्यवाही चालू आहे.

## अटल भूजल योजना

सदर योजना राज्यातील १३ जिल्ह्यातील ४० तालुक्यातील १३३९ ग्रामपंचायतीमधील १४४० गावांमध्ये केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या अर्थसाहाय्याने ५ वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येत आहे. अटल भूजल योजनेमधून या योजनेतील समाविष्ट गावामधील अल्प व अत्यल्प भूधारक आणि इतर शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे २५% आणि ३०% पूरक अनुदान देण्यात येत आहे. त्याकरिता जिल्हास्तरावर रु. २०.०० कोटी निधि सन २०२२-२३ करिता उपलब्ध करून देण्यात आला आहे. या योजनेंतर्गत महा.डी.बी.टी. पोर्टलवर ११७४० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून ११२४८ लाभार्थ्यांना रु. १३.९० कोटी पूरक अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे.

---------------------

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान

केंद्र शासनाने राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सन २००५-२००६ पासून राबविण्यास सुरुवात केलेली आहे. सन २०१४-१५ पासून सदरची योजना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या नावाने राबविण्यात येत आहे. या अभियानातील केंद्र व राज्य हिस्सा सन २०१४-१५ पर्यंत केंद्र ८५ टक्के व राज्य १५ टक्के होता, मात्र सन २०१५-१६ पासून केंद्र ६० टक्के व राज्य ४० टक्के या हिश्श्यानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१ वैविध्यपूर्ण कृषी हवामान विभागानुसार प्रादेशिक अनुकूलता व गरजा लक्षात घेवून त्या त्या प्रदेशातील फलोद्यान क्षेत्राचा संशोधन, तंत्रज्ञान प्रसार, काढणीत्तोर तंत्रज्ञान, प्रक्रिया व पणन सुविधा यांच्या माध्यमातून समूह पद्धतीने सर्वांगीण विकास करणे.

२ शेतकऱ्याचे आर्थिक राहणीमान उंचावणे व आहारविषयी पोषणमूल्य वाढविणे.

३ अस्तित्वात असलेल्या फलोत्पादन विषयक विविध योजनांमध्ये समन्वय साधून एकरुपता आणणे.

४ पारंपरिक उत्पादन पद्धतीची आधुनिक शास्त्रीय ज्ञानाशी सांगड घालून तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार आणि प्रचार करणे.

५ कुशल आणि अकुशल विशेषत: बेरोजगार तरुणांकरिता रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेची उद्दिष्टे साध्य करण्याचे दृष्टीने विविध घटकांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. **गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य निर्माण करणे** (रोपवाटिका, उती संवर्धन प्रयोगशाळा), **क्षेत्रविस्तार** फळ पिके (ड्रॅगन फ्रुट, अंजीर, किवी, स्ट्रॉबेरी, ॲवोकॅडो, तेंदुफळ, पॅशन फ्रुट, ब्लुबेरी, आवळा, बेल, जांभुळ, करवंद, चिंच, फणस, मसाला पिके (हळद, मिरची, आले, बहुवार्षिक मसाले पिके), फुल पिके (दाड्यांची फुले, कंदवर्गीय फुले व सुट्टी फुले), आळिंबी उत्पादन, **जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन** (आंबा, मोसंबी, संत्रा व चिकु), **सामुहिक शेततळे व शेततळे अस्तरीकरण, संरक्षित शेती** (हरितगृह, शेडनेट व प्लास्टीक मल्चींग), **एकात्मिक अन्नद्रव्ये व एकात्मिक किड व्यवस्थापन, मनुष्यबळ विकास कार्यक्रम** (शेतकरी प्रशिक्षण), **मधुमक्षिका पालन, फलोत्पादन यांत्रिकीकरण** (ट्रॅक्टर २० पीटीओ, पॉवर टिलर, जमीन सुधारणा उपकरणे व पिक संरक्षण उपकरणे) **काढणीत्तोर व्यवस्थापन** (पॅक हाऊस, एकात्मिक पॅक हाऊस, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, शितगृह, शितखोली, रायपनिंग चेंबर, शितवाहन, कांदाचाळ, एकात्मिक शितसाखळी) या विविध घटकांसाठी वैयक्तिक लाभार्थी, लाभार्थी समुह, खाजगी क्षेत्र तसेच सार्वजनिक क्षेत्रासाठी अर्थसहाय्य दिले जाते.

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाने २४ ऑगस्ट, २००५ चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ स्थापन केलेले असून संस्था नोंदणी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० नुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडे नोंदणी करण्यात आलेली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मा. सचिव कृषी यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती व जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा अभियान समिती स्थापन केलेली आहे.

अभियान अंमलबजावणीसाठी जिल्हा अभियान समिती प्रत्येक जिल्ह्याच्या फलोत्पादन विकासाच्या गरजेनुरुप वार्षिक कृती आराखडा तयार करते. राज्यस्तरावर सर्व जिल्ह्यांची आवश्यकता तपासून राज्यस्तरावर त्यास अंतिम स्वरुप देण्यात येते व त्यास केंद्र शासनाची मान्यता घेऊन सर्व जिल्ह्यांना त्यांनी शिफारस केलेल्या आराखड्यानुसार अनुदान उपलब्ध करून अभियानाची अंमलबजावणी करण्यात येते.

सन २००५-०६ ते २०२१-२२ या वर्षातील वर्षनिहाय मंजूर आराखडा व झालेला खर्च याबाबतचा तपशील आकृती १ मध्ये देण्यात आलेला आहे.




Figure 1 योजनेतील मंजूर आराखडा व खर्च तपशिल

सन २००५-०६ पासून सन २०२१-२२ पर्यंत विविध घटकांवरील खर्च २१७८.८० कोटी झालेला असून विविध घटकावरील झालेल्या खचार्च प्रमाण पुढीलप्रमाणे आहे.

(रक्कम रु. लाख)

| अ.क्र. | घटक | साध्य | |
|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक |
| १ | गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य (संख्या/हे.) | १९१७ | ३७८५.३३ |
| २ | क्षेत्र विस्तार (हे.) | ३०५१११ | ४७७४१.३४ |
| | मशरुम युनिट (संख्या) | ३१ | २७७.५५ |
| | **एकूण क्षेत्र विस्तार** | **३०५११६५.८०** | **४८०१८.१९** |
| ३ | जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन (हे.) | ४७०६४ | ४९५६.७४ |
| ४ | सामुहिक शेततळे व शेततळे अस्तरीकरण (संख्या) | २३१२९ | ४८५५६.८५ |
| ५ | संरक्षित शेती (हे.) | २२१५५ | ३५४०४.६३ |
| ६ | जैविक औषधी निर्मिती/पिक चिकित्सालय/उतीपाने तपासणी व एकात्मिक कीड/अन्नद्रव्ये व्यवस्थापन (संख्या/हे.) | ४४४९६ | २०८६.०९ |
| | सेंद्रीय शेती (हे.) | १५५२९ | २१२५.१६ |
| ७ | सेंटर ऑफ एक्सलन्स-इंडो-इस्त्राईल व इंडो-डच (संख्या) | ६ | ४०४७.४१ |
| ८ | मधुमक्षिका पालन (संख्या) | १०७७७ | १३९.१९ |
| ९ | फलोत्पादन यांत्रिकीकरण (संख्या) | २५१३३ | ९०८५.८८ |
| १० | मनुष्यबळ विकास कार्यक्रम (संख्या) | २९४१८५ | ३७७९.७१ |
| ११ | काढणीत्तोर व्यवस्थापन (संख्या) | १४५५३ | ३००३३.४४ |
| १२ | पणन सुविधा (संख्या) | १६ | ८०.४४ |
| १३ | अभियान व्यवस्थापन | .. | ८४५२.३३ |
| १४ | इतर घटक (BBD, TSG, GAP) (हे.) | ९६६५६ | १७३२८.२३ |
| | **एकूण** | | **२१७८८०.३२** |

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत गुणवत्ता केंद्रांची स्थापना

राज्यामध्ये विविध फळपिकांच्या लागवडीस असलेल्या बाबी विचारात घेता आंबा, संत्रा व डाळिंब या प्रमुख फळपिकांची उत्पादकता वाढविणेची आवश्यकता लक्षात घेऊन इस्त्राईल देशाच्या तांत्रीक सहकार्याने प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, नवीन जातींचा तसेच लागवड साहित्याचा वापर करणे, आदर्श कृषि पद्धतीचा अवलंब करणे त्याचबरोबर काढणीत्तोर तंत्रज्ञान, पणन व निर्यात याद्वारे या फळपिकांचे मुल्यवर्धन करणे या दृष्टीकोनातून इंडो-इस्त्राईल प्रकल्पांतर्गत विदर्भातील संत्रा, मराठवाड्यातील केशर आंबा, पश्चिम महाराष्ट्रातील डाळिंब व कोकणातील हापूस आंबा, या पिकांची निवड करण्यात आली होती. या प्रकल्पावरील झालेल्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्रांची नावे | मंजूर वर्ष | प्रकल्प रक्कम (रु. लाख) | प्रकल्प खर्च (रु. लाख) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंबा गुणवत्ता केंद्र, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली | २०१०-११ | ६३६.०० | ५९५.८१ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| २ | संत्रा गुणवत्ता केंद्र, कृषी महाविद्यालय, नागपूर | २०१०-११ | ४५४.४० | ४५४.४० | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| ३ | डाळिंब गुणवत्ता केंद्र, म.फु.कृ.वि., राहुरी, जि. अहमदनगर | २०११-१२ | ४५८.०० | ३६७.६१ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| ४ | केशर आंबा गुणवत्ता केंद्र, हिमायत बाग, जि. औरंगाबाद | २०१२-१३ | ७४४.०० | ७२१.७३ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| | **एकूण** | | **२२९२.४०** | **२१३९.५५** | |

राज्यात भाजीपाला व फुलपिकांचे क्षेत्र मोठे आहे. या पिकातील अद्यावत तंत्रज्ञान व नविन प्रजातीची शेतकऱ्यांना माहिती व्हावी यादृष्टीने नेदरलॅन्ड देशाच्या सहकार्याने इंडो-डच प्रकल्पांतर्गत भाजीपाला गुणवत्ता केंद्र, केव्हीके, बारामती, जि. पुणे येथे व फुलपिके गुणवत्ता केंद्र-NIPHT तळेगाव, जि. पुणे येथे गुणवत्ता केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

**इंडो-डच प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या प्रकल्पाची प्रगती**

| अ.क्र. | केंद्रांची नावे | मंजूर वर्ष | प्रकल्प रक्कम (रु. लाख) | प्रकल्प खर्च (रु. लाख) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | भाजीपाला गुणवत्ता केंद्र, केव्हीके बारामती, जि. पुणे | २०१५-१६ | १३५३.५४ | १०००.०० | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
| २ | फुलपिके गुणवत्ता केंद्र, NIPHT तळेगांव, जि. पुणे | २०१६-१७ | १२१८.९७ | ९९९.५१ | प्रकल्प पूर्ण व प्रशिक्षण सुरू |
